महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र.मुंविमं/कें.नि./फेब्रु/मार्च-२०२३/४९८४
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : १५ /०३/२०२३

प्रति,

**सर्व परिरक्षक / केंद्रसंचालक**
**महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई.**

**विषय :-** माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२३ साठी परीक्षार्थी पाल्य असलेल्या शिक्षकांना परीक्षेच्या कार्यातून मुक्त ठेवणे बाबत आणि परीक्षेशी संबंध नसलेल्या शिक्षकांना परीक्षाकालावधीत परीक्षा केंद्रांवर न थांबवणेबाबत.

**संदर्भः-** भारतीय जनता पार्टी, कोकण विभाग शिक्षक आघाडी, यांचे जा.क्र. १२५/२०२३ दि.०३/०३/२०२३ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, भारतीय जनता पार्टी ,कोकण विभाग शिक्षक आघाडी यांनी माध्यमिक शालान्त व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२३ साठी परीक्षार्थी पाल्य असलेल्या शिक्षकांना परीक्षेच्या कार्यातून मुक्त ठेवणे बाबत आणि परीक्षेशी संबंध नसलेल्या शिक्षकांना परीक्षाकालावधीत परीक्षा केंद्रांवर न थांबवणेबाबत कळविलेले आहे.

तरी पर्यवेक्षण वा परीक्षेसंदर्भातील अनुषंगिक कामे नसणा-या शिक्षकांना दररोज परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणेबाबत सक्ती केली जाते,त्यामुळे परीक्षा केंद्रावर अनावश्यक गर्दी दिसून येते आणि परीक्षा संचालनात अडथळे निर्माण होतात.

तेव्हा ज्यांचे पाल्य परीक्षेस प्रविष्ठ झालेले आहेत त्या शिक्षकांना आणि परीक्षा कामकाजाशी संबंधित नसलेल्या शिक्षकांना परीक्षा केंद्रांवर थांबविण्यात येवू नये, व परीक्षा सुरळीतपणे पार पडेल याची दक्षता घ्यावी.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई-४०० ७०३.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव :-**

१) शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.ठाणे/रायगड/पालघर
२) शिक्षण निरीक्षक मुंबई दक्षिण/पश्चिम/उत्तर

**प्रत माहितीस्तव :-**

भारतीय जनता पार्टी, कोकण विभाग शिक्षक आघाडी, ४०३, स्वामी दर्शन, शेलार पार्क, खडकपाडा सर्कल, कल्याण (प.) - ४२१३०१

Telephone :- 27652445 , 27662504 , 27881075 , 27881077, 27899987 Fax:- 27659491 / 27881349
Email - sscbsc.mumbaiboard@gmail.com Manyata207@gmail.com Website - www.sscboardmumbai.in



Scanned by CamScanner